# इकडे शाळेला सुट्टी, तिकडे बालविवाहाची सक्ती

## रोखले तीन बालविवाह : चाकणकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** गेल्या काही दिवसांत होऊ घातलेल्या बालविवाहाबद्दल जागरूक नागरिकांनी तक्रारी केल्या. त्यामुळे महिला आयोगाने तातडीने पावले उचलत संबंधित प्रशासनाला, यंत्रणेला याची माहिती दिली. त्यामुळे तीन बालविवाह रोखले गेले. शालेय सुट्टीचा फायदा घेत हे बालविवाह होणार होते, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिली.

हे केवळ तीन बालविवाह रोखणे हे उद्दीष्ट्य नव्हते तर तीन मुलींच्या जिवाशी, भविष्याशी होणारा खेळ थांबवणे होते असेही त्यांनी म्हटले आहे. कोविड नंतर मोठ्या प्रमाणात बालविवाह होत आहेत. पुरोगामी महाराष्ट्रात दुर्दैवाने आजही बालविवाह रोखू शकलेला नाही. लोकांची मानसिकता बदलणे व प्रशासनाला अधिक सक्रिय करणे ही दोन मोठी आव्हाने असल्याचे चाकणकर यांनी 'लोकमत'शी बोलताना सांगितले.



### मुलगी ओझे वाटते

आयोगाच्या मार्फत जिल्ह्यात जाऊन आढावा घेत घेऊन सुनावणी घेत असताना अनेक गंभीर गोष्टी समोर आल्या. हे खेदाने सांगावे वाटते की, पालकांना मुलगी हे ओझे वाटते. चौदाव्या वर्षीच मुलीचे लग्न लावून तिला अंधारात ढकलल जात आहे असेही चाकणकर म्हणाल्या.

### मताच्या राजकारणासाठी कुणी बोलत नाही

सध्या शाळांना सुट्या आहेत आणि याच काळात प्रशासनाचे लक्ष नाही हे पाहून मोठ्या प्रमाणावर नववी-दहावी झालेल्या मुलींची लग्न लावून देतात. बालविवाहाबाबत पुढाऱ्यांना माहीत असते. मात्र मताच्या राजकारणासाठी कोणीच याबद्दल बोलत नाही हे बदलायला हवे असे त्यांनी सांगितले.

लोकमत - 30/5/2023.